**CNR NO- MHSO060031962017**

**विशेष दिवाणी दावा क्र.३८/२०१७**

**सुरेखा गायकवाड.**

**वि.**

**महाराष्ट्र सरकार व इतर.**

## नि.क्र.१०५ वरील आदेश
## (घोषित दि. २२/१०/२०२४)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करुन त्यांच्या विरुध्द नि.क्र.१०० वर झालेला 'अर्ज विना म्हणणे' चालविण्याचा आदेश रद्द करुन म्हणणे स्वीकारण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीतर्फे सदर अर्जास विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] प्रस्तुतचा दावा हा सन २०१७ मध्ये निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला असून वादीचा साक्ष पुरावा नोंदविल्यानंतर प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी नि.क्र.१०० व्दारे प्रस्तुत दावा चालविण्याचा या न्यायालयाला कार्यक्षेत्र नसल्याचे लक्षात घेवून दावा काढून टाकण्याची विनंती केली. वादीला पुरेशी संधी असूनही वादीने म्हणणे दाखल न केल्यामुळे दि.०२/०५/२०२४ रोजी वादी विरुध्द अर्ज नि.क्र. १०० 'अर्ज विना म्हणणे' चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत अर्जाव्दारे असे नमुद करण्यात आले की, वादी विहित मुदतीत आपले म्हणणे दाखल करु शकले नाहीत, त्यांनी जाणिवपुर्वक म्हणणे दाखल करण्यास विलंब केलेला नाही तथा म्हणणे दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

०४] प्रस्तुत दाव्याचे कारण व करण्यात आलेली मागणी तथा प्रतिवादीतर्फे न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाबत घेण्यात आलेला आक्षेप लक्षात घेता नि.क्र.१०० चा अर्ज गुणदोषांवर निकाली काढणेकरीता वादीला आपले म्हणणे

मांडण्याची संधी मिळणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादीस आपली बाजू मांडण्याची संधी न मिळाल्यास वादीचा दावा संधी न दिल्याच्या कारणाने निष्फळ होवू शकतो व ही बाब न्यायसंगत होणार नाही. वादीने म्हणणे दाखल करण्यास जाणिवपुर्वक विलंब केला असे सकृतदर्शनी मत नोंदविण्याकरीता पटलावर कोणतीही परिस्थीती उपलब्ध नाही. अश्या परिस्थीतीत वादी विरुध्द पारीत झालेला नि.क्र.१०० वरी 'अर्ज विना म्हणणे' चा आदेश रद्द करुन दाखल करण्यात आलेले म्हणणे स्वीकारणे योग्य असल्याचे माझे मत झालेले आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज मंजूर करण्यात येतो.

२] वादी विरुध्द नि.क्र.१०० वर पारीत झालेला 'अर्ज विना म्हणणे' चालविण्याबाबतचा आदेश रद्द करण्यात येतो व वादीतर्फे दाखल करण्यात आलेले म्हणणे स्वीकारण्यात येते.

AMIT ASHOKRAO KHANDALE Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE Date: 2024.10.22 17:35:02 +0530

**दि.२२/१०/२०२४.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 22.10.2024 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 22.10.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 22.10.2024 |